कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २७३ /२०२४ दि. २२/१०/२०२४

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

संदर्भ :— कापूरबावडी वा. उप विभाग यांचे कडील जा.क्र. ६७७/२०२४, दि: २१/१०/२०२४

*****

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ **चे अनुषंगाने** महामानव शिव शाहु फुले आंबेडकर स्मृती सभागृह पोखरण रोड नं.२, ठाणे १४६ ओवळा माजीवाडा मतदार संघाचे कार्यालय येथे अमेदवारांचे नामनिर्देशन पत्रे व नामनिर्देशन फॉर्म भरतेवेळी विविध पक्षाचे उमेदवार हे शक्तीप्रदर्शन करण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** १) पोखरण रोड नं. २ वरील गांधीचौकातुन पुढे सरळ जाऊन हनुमान मंदिर सर्कल चौक मार्गे उपवन तलावाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बेथनी हॉस्पिटल समोरील कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर वाहने पोखरण रोड नं. २ हनुमान मंदिर सर्कल येथून उजवीकडे वळण घेवून वसंत विहार सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २२/१०/२०२४ रोजी पासुन ते दिनांक २९/१०/२०२४ रोजी सकाळी ०९:०० ते सायंकाळी १९:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/— सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
स.पो.आ. वागळे वाहतूक विभाग, व पोलीस निरीक्षक, कापूरबावडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner